




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ११३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०५ डिसेंबर २०२४


## आज शपथविधी सोहळा ! कोण कोण घेणार शपथ ?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, मुंबई :** गेल्या अनेक दिवसांपासून असलेला सत्ता स्थापनेचा तिढा अखेर शेवटच्या क्षणी सुटला आहे. राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस शपथ घेणार आहेत. तर, दोन उपमुख्यमंत्रीही राज्याला लाभणार आहेत. दरम्यान, उद्याच्या शपथविधीला कोण कोण शपथ घेणार, कोणाच्या पारड्यात कोणतं खातं पडणार याचीही उत्सुकता राज्यातील जनतेला आहे. यावरून भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. ते एबीपी माझाशी बोलत होते.

२० नोव्हेंबरला मतदान होऊन २३ नोव्हेंबरला राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला. या निकालानुसार महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. भाजपाला १३२ जागा, शिवसेना (एकनाथ शिंदे) ५५ जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ४० जागा मिळाल्याने महायुतीच राज्यात सत्ता स्थापन करणार हे स्पष्ट झालं होतं. परंतु, मुख्यमंत्री पदावरून राज्यात मोठा गोंधळ निर्माण



झाला होता. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस या पदासाठी अडून बसले होते, अशी चर्चा होती. त्यामुळे सत्ता स्थापनेचा तिढा निर्माण झाला होता. अखेर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतून माघार घेतली. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा झाला. दरम्यान, आज भाजपाच्या विधिमंडळ पक्षाची बैठक झाली. या बैठकीत चंद्रकांत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावाला सर्वांनी अनुमोदन दिलं. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळ गटनेतेपदी नियुक्ती झाली. तसंच, तेच आता मुख्यमंत्री असणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. उद्याच्या शपथविधीला ते मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. तसंच, देवेंद्र फडणवीसांसह कोण कोण शपथ घेणार याचीही उत्सुकता आहे. याबाबत सुधीर मुनगंटीवार म्हणाले, कोणी शपथ घ्यावी याबाबत राष्ट्रीय पातळीवर चर्चा केली जाईल, त्यानंतर संदेश आल्यावर शपथ घेतली जाईल. सध्या जे वातावरण आहे त्यानुसार मुख्यमंत्री आणि २ उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी उद्या होईल. १६ डिसेंबरपासून नागपूरचं हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे. त्याआधी इतर मंत्र्यांचा शपथविधी कार्यक्रम होईल.

**उद्याच सर्वांचा शपथविधी व्हावा अशी आमदारांमध्ये चर्चा**

शपथविधीच्या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबईत येणार आहेत. त्यामुळे त्यांच्यासमोरच आमदारांचा मंत्रिपदाचा शपथविधी सोहळा व्हायला हवा अशी चर्चा आहे. त्यावर सुधीर मुनगंटीवार म्हणाले, २८ नोव्हेंबर २०१९ मध्येही असाच शपथविधी झाला होता. त्यावेळीही फक्त मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनीच शपथ घेतली होती.

**एकनाथ शिंदे नाराज आहेत का?**

महायुतीच्या निर्णयावर एकनाथ शिंदे नाराज आहेत का? असाही प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, ते फार आनंदी आहेत. ते कधीच नाराज होत नाही. जो माणूस आपल्या कपाळ्यावर टीळा लावतो तो कधीच नाराज होऊ शकत नाही.

## सुपा एमआयडीसी मध्ये निकृष्ठ रस्त्यांची कामे ?
## ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०४, सुपा (अहिल्यानगर)**

सुपा एम आय डी सी मधील अंतर्गत रस्त्यांची कामे पूर्ण पणे इस्टिंमेट प्रमाने न करता ठेकेदाराने मनमानी पद्धतीने केले असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या निर्दशनास आले आहे. त्यामुळे झालेल्या कामांचं दर्जा बाबत ऑडीट होणं गरजेचं आहे सुरु असलेली रस्ता काम निकृष्ट दर्जाची केली असून कामं चालू असतांनाच मांग रस्ता ठिक ठिकाणी खड्डे मय होऊन जैसे थे बनला आहे. तसेच ठिक ठिकाणी एकच रफ हात मारलेला आहे. कुठे चढ तर कुठे उतार अशा प्रकारे फक्त मलमपट्टी करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे हे सर्व अधिकारी यांच्या आशीर्वादाने सुरू आहे त्यामुळे झालेल्या कामांची पाहणी करून संबंधित रस्ता कामावर देखरेख करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करुन रस्ता काम करणाऱ्या ठेकेदाराला एक रुपया चे ही बिल अदा न करता काळ्या यादीत टाकण्यात यावे अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने रस्त्यांच्या दर्जा कामासंदर्भात लिखित स्वरूपात खुलासा केला नाही तर मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांनी बोलताना सांगितले, तसे पत्र औद्योगिक बांधकाम विभाग अहिल्या नगर यांना दिले असल्याचे पवार यांनी सांगितले. संबंधित अधिकारी आणि ठेकेदाराला पाठीशी घातले तर नक्कीच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रोषाला सामोरे जावे लागेल त्यामुळे काय कारवाई होणार हे पहाने औचित्याचे ठरेल.

## लाडक्या बहिणींना लागले पुढील हप्त्याचे वेध !

### लाडकी बहिण योजनेचे नियम बदलल्याने होतीय सर्वत्र चर्चा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहिल्यानगर :** महायुतीसाठी विधानसभा निवडणुकीत गेम चेंजर ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना पुढील काळात चालू राहील का ? लाडक्या बहिणींचा निधी मिळणार का ? सदरचा हप्ता कधी मिळणार याची प्रतिक्षा लाभार्थी महिलांना लागून राहिली आहे. त्यातच विधानसभेला महायुतीला मोठे बहुमत मिळाल्यानंतर आता या योजनेचे निकष बदलणार असल्याचेही सांगितले जात आहे.

**लाडक्या बहिणींना सतावतेय भिती !**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे निकष बदलणार असल्याचे सध्या सांगितले जात आहे. लाभार्थी महिलेचा पती आयकर भरतो का ? कुटुंबाकडे चारचाकी वाहन आहे का ? एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक महिलांनी अर्ज केले आहेत का ? विधवा, परित्यक्ता, निराधार महिला व अन्य योजनांचा लाभ घेतला जात असताना या योजनेचा लाभ घेतला जातो आहे का ? असे अनेक निकष तपासले जाणार असल्याचे सांगितले जात आहे. जर या निकषांतर्गत महिला अपात्र ठरल्या तर त्यांना लाडक्या बहिणींचा हप्ता जमा होणार नाही अशी भीतीही सतावत आहे.

परिणामी, लाडक्या बहिणी आता चिंताक्रांत बनल्या आहेत. दरम्यान, राज्य सरकारने निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू करून महिलांना स्वतः च्या पायावर उभे करण्याचे पाऊल उचलले आहे. सुमारे ७ हजार इतका निधी महिलांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला. त्यानंतर विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू झाल्याने या काळात योजनांचा लाभ देता येत नसल्याने निवडणूक संपताच खात्यात पैसे जमा करण्याचे आश्वासन सरकारने यापूर्वी दिले होते. नवीन सरकार सत्तेवर येणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर सहाव्या हप्त्याबाबत बहिणींमध्ये उत्सुकता लागली आहे.

विधानसभा निवडणुकीत ही योजना महत्वपूर्ण ठरल्याने महायुती सरकार विक्रमी मताधिक्याने पुन्हा एकदा सत्तेवर आले आहे. आता या लाडक्या बहिणींना पुढील हप्त्याची प्रतीक्षा असून,तो खात्यात कधी जमा होणार,याची चर्चा सुरू आहे. सरकार पुन्हा सत्तेवर आल्यास या योजनेचे पैसे दिड हजार रुपयांवरून २१०० रुपये करणार असल्याचे आश्वासन महायुतीकडून करण्यात आले होते. आता महायुतीचे सरकार आल्याने या योजनेचा हप्ता वाढणार का ? याकडे लाडक्या बहिणींचे लक्ष लागून राहिले आहे.

## शिंदेंचं कळेल, पण मी नक्की शपथ घेणार - अजित पवार



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०४, ठाणे :** महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा पेच अखेर सुटला असून राज्यातील सत्तास्थापनेसाठी भाजप, शिंदे गट, आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी अजित पवारांच्या मिश्कील शैलीने वातावरण हलकं झालं आणि उपस्थितांमध्ये हशा पिकला.

गुरुवारी झालेल्या भाजपाच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांची गटनेतेपदी निवड झाली. त्यानंतर विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि फडणवीस यांनी राजभवनात जाऊन सत्तास्थापनेचा दावा केला. त्यानंतर राजभवनात या तिन्ही नेत्यांनी पत्रकार परिषद घेतली.पत्रकार परिषदेदरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारण्यात आले की, ते पुढील सरकारमध्ये मुख्यमंत्री म्हणून कायम राहणार का? त्यावर शिंदे म्हणाले, संध्याकाळपर्यंत धीर धरा, कोण मुख्यमंत्री असेल ते समजेल. शिंदे यांचे उत्तर संपताच अजित पवार म्हणाले, शिंदेंचं माहित नाही, पण मी उद्या नक्की शपथ घेणार आहे. मी थांबणार नाही. त्यांच्या या मिश्कील उत्तरावर उपस्थित सर्वांनी हास्यकल्लोळ केला. शिंदे यांनीही पवारांचा थोडक्यात समाचार घेत म्हणाले, दादांना शपथ घेण्याचा अनुभव आहे, मग ती सकाळची असो किंवा संध्याकाळची. यावर अजित पवार म्हणाले, हो, मागच्या वेळी घेतली होती शपथ. पण यावेळी जी शपथ घेऊ ती पाच वर्षांसाठी असेल.

दरम्यान, राज्यपालांनी नव्या सरकारच्या शपथविधीसाठी शुक्रवार, ५ वाजता वेळ दिली आहे. या शपथविधीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह २२ राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. अजित पवारांच्या मिश्कील बोलण्याने राजकीय चर्चांमध्ये रंगत आणली असून उद्याच्या शपथविधीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ‘त्याने’ अनेकांचे प्राण वाचविले; पण त्याचा जीव...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, बुलडाणा :** नियती, नशीब कधी काय करेल याचा कुणीच अंदाज व्यक्त करू शकत नाही, असे म्हणतात. लोणार तालुक्यातील एका अपघातात याचा दुर्दैवी प्रत्यय आला. रात्रीचा दिवस करून आणि कधी कधी शेकडो किलोमीटरचा प्रवास करून अनेकांचे प्राण वाचविणाऱ्या एका इसमाचा अपघाती मृत्यू जनमानसाला सुन्न करणारा ठरला.


अक्षय उकंडा असे अपघातात ठार झालेल्या इसमाचे नाव आहे. तो लोणार तालुक्यातील किनगाव जट्टू (आईचा तांडा) येथील राहणारा होता. रुग्णवाहिका चालक असलेल्या अक्षय आणि त्याच्या परिवाराचा उदरनिर्वाह यातून तुटपुंज्या कमाईतून भागविला जायचा.

काल मंगळवारी रात्री उशिरा तो चालवित असलेल्या रुग्णवाहिकेला एका भरधाव मालवाहू वाहनाने धडक दिली.बीबी दुसरबीड मार्गावरील पेट्रोल पंपाजवळ हा अपघात झाला. ही धडक इतकी भीषण होती की रुग्णवाहिका समोरून ओळखू न येण्याइतकी चेपल्या गेली. यामुळे चालक अक्षय जागीच दगावला. या अपघातात त्याचा साथीदार , रुग्णवाहिकेचा वाहक राजेश्वर वाकळे (३०राहणार वाशी) हा गंभीर जखमी झाला



आहे. प्राप्त माहितीनुसार रुग्णवाहिका बीबी कडून दुसरबीड कडे जात होती. यावेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या भरधाव ‘ट्रक’ने रुग्णवाहिकेला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच (लोणार तालुक्यातील )बीबी पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदीप पाटील आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मार्गावरील वाहतूक सुरळीत केली. जखमी वाहक राजेश्वर वाकळे याच्यावर आधी बीबी( तालुका लोणार) येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात प्रथमोपचार करण्यात आले. मात्र प्रकृती अत्यवस्थ असल्याने त्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी जालना येथे हलवण्यात आले. या दुदैवी घटनेचा पुढील तपास बीबी पोलीस करीत आहेत. या घटनेमुळे बीबी परिसरासह लोणार तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

## खुनाच्या खटल्यातुन ७ आरोपींची निर्दोश मुक्तता




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील मौजे बदकलवाडी येथे दि.२ ऑक्टोंबर २०१८ रोजी भिमराव भंडारे यांची हत्या झाल्यावरून विजय भंडारे यांच्या फिर्यादीवरून पोलिस स्टेशन मुदखेड येथे गु.र.न. १७२/२०१८ अन्वये कलम ३०२,४५२,१४३,१४७,१४८,१४९,५०६,५०४, भा.दं.वि. तथा ४/२५ हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंद करून तपासिक अधिकाऱ्यांनी सात आरोपींना अटक करून त्यांच्या विरुद्ध दोषारोप मा. नांदेड सत्र न्यायालयात दाखल केले असता खटल्यात सरकारी पक्षाने एकूण १३ साक्षीदार तपासले.

परंतू आरोपी विरुद्ध सबळ पुरावा आढळून न आल्याने पुराव्याअभावी गुन्हा सिद्ध न झाल्याने आरोपींना दि.३ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा सत्र न्यायाधीश मा. सी.व्ही.मराठे यांच्या न्यायालयाने निर्दोष मुक्त केले.

सदर खटल्यात मुख्य अरोपी प्रदिप उर्फ पप्पू नामदेव हाटकर यांच्या वतीने अँड माधव एम. हाटकर यांनी काम पाहिले व त्यांचे सहकारी म्हणुन अँड के.ए. पंडित, अँड एस.एन. इजळीकर, अँड ए.एम. भुरे, अँड सुबोध कोकरे, अँड व्ही. एस. गरजे, आणि अँड तेजस्विनी मुंगल यांनी सहकार्य केले.

## ‘ब्रॅण्ड’च्या नावाखाली बनावट कपडे विक्री ; वाकड पोलिसांचा तपास सुरु

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, पिंपरी :** नामांकित ‘ब्रॅण्ड’चे बनावट कपडे विक्री केल्याप्रकरणी वाकड येथील एका दुकानदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरुण नरेश शर्मा (वय ३८, रा. वाकड) असे गुन्हा दाखल झालेल्या दुकानदाराचे नाव आहे. याप्रकरणी महेंद्र सिंग (वय ३७, रा. कसबा पेठ, पुणे) यांनी वाकड पोलीस ठाण्यात



फिर्याद दिली आहे. शर्मा याचे कस्पटे वस्ती वाकड येथे कपड्यांचे दुकान आहे. त्याने दुकानामध्ये नामांकित कंपन्यांचे स्टिकर असलेले कपडे विक्रीसाठी ठेवले होते. कंपनीला बनावट कपड्यांची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कंपनीकडून पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. पोलिसांनी याबाबत कारवाई करत दोन लाख ६३ हजार २३० रुपये किमतीचे बनावट कपडे जप्त केले आहेत. वाकड पोलीस तपास करीत आहेत.



# संपादकीय

## खर्गे यांचे वादग्रस्त वक्तव्य !

'मी हिंदू आहे, माझे नाव मल्लिकार्जुन आहे. १२ पवित्र ज्योतिर्लिंगांपैकी मी एक आहे' असे विधान करून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पुन्हा एकदा वाद ओढवून घेतला आहे. देशातील एका प्रमुख पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असतानाही वाद ओढवून घेणे हे खर्गे यांचे नित्याचेच आहे. आता तर त्यांनी रामलीला मैदानात जाहीर सभेत थेट हिंदूंच्या भावना दुखावणारे वक्तव्य केले आहे. जगभरात भगवान शिवाचे कोट्यवधी भक्त आहेत.

भगवान शिवाची जागृत स्थाने असलेली १२ ज्योतिर्लिंगे ही हिंदूंची पवित्र तीर्थस्थाने आहेत. साक्षात भगवान शिव या स्थानी विराजमान आहेत या भावाने या ठिकाणी प्रतिवर्षी लाखो भक्तगण येत असतात. प्रति सोमवार आणि महाशिवरात्रीच्या दिवशी या ठिकाणी भक्तांची प्रचंड रीघ पाहायला मिळते. या पवित्र स्थानांपैकी मी एक असल्याचे खर्गे यांनी केलेले वक्तव्य कोट्यवधी शिवभक्तांच्या भावना दुखावणारे आहे, त्यामुळे या वक्तव्याबाबत त्यांनी शिवभक्तांची जाहिर क्षमा मागावी अशी मागणी सर्वत्र करण्यात येत आहे. या सभेतच



त्यांनी एका समाजाला खुश करण्यासाठी अनेक वक्तव्य केली. लाल किल्ला, ताजमहाल, कुतुब मिनार, चार मिनार, लाल किल्ला या वस्तू मुसलमानांनी बांधल्या म्हणून भाजप सरकार त्या उध्वस्त करू पाहत असल्याचे विधानही त्यांनी या सभेत केले. मुळात भाजप सरकारचा यामध्ये तिळमात्र संबंध नसून या इमारती हिंदू राजांनी बांधल्या असल्याचे असंख्य पुरावे पुरातत्व खात्याला सापडल्यामुळे हिंदू पक्षकारांनी हे प्रकरण न्यायालयात नेले आहे. २७ हिंदू आणि जैन मंदिरे तोडून कुतुब मिनार येथे मशीद बांधली गेल्याचे फलक स्वतः पुरातत्व खात्याने संशोधन करून या ठिकाणी लावले आहेत. अन्य ठिकाणीही तसे पुरावे मिळाल्यानेच हा वाद आता न्यायालयात गेला आहे. असे असताना खर्गे मुद्दामहून मुसलमानांची माथी भडकावून समाजात दुही माजवण्याचा काम करत आहेत असा आरोप भाजपने खर्गे यांच्यावर करताना अन्य कोणत्या पंथीयाचे श्रद्धास्थान म्हणजे मी आहे असे वक्तव्य करण्याचे धाडस खर्गे यांनी केले असते का ? असा प्रश्नही विचारला आहे. लोकसभेसह अनेक राज्यांत सपाटून मार खाणारी काँग्रेस यापुढे आत्मचिंतन करणार आहे कि देशात बहुसंख्य असणाऱ्या हिंदूंविषयी वादग्रस्त वक्तव्ये करून हिंदूंचा रोष ओढवून घेणार आहे ?

**सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

### फास्टफुड आरोग्यास घातक



आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेषः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलांच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदार्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो असे जाणकार सांगतात त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

## विंचूर येथे अबॅकसच्या राज्य पातळीवरील विद्यार्थ्यांचा गुणगौरव..

**अक्षराज : सुनिल क्षिरसागर**

**दि.०४, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथे श्री स्वामी समर्थ अर्केडमीच्या विद्यार्थ्यांना अबॅकस या राष्ट्रस्तरीय, राज्यस्तरीय, जिल्हा स्तरावरील निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा विंचूर येथील वेदांत हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला होता. या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी यशस्वी विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

आय जिनिअस तर्फे सप्टेंबर २०२४ मध्ये आयोजित राष्ट्रस्तरीय, राज्यस्तरीय, जिल्हा स्तरावरील परीक्षेमध्ये श्री.स्वामी समर्थ अर्केडमी,विंचूरचे एकूण ४२ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी २४ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून त्यांची राज्यस्तरीय अबॅकस परीक्षेसाठी निवड झाली. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक नंदकुमारजी देवढे, राजेंद्रजी चांदे, निफाड येथील आय जीनियस अर्केडमीच्या संचालिका नीता पवार, हेड ऑफ आयजीनियस एक्झाम डिपार्टमेंटचे



दत्ता सूर्यवंशी, निफाड येथील होरायझन अर्केडमीच्या प्राचार्या स्नेहल सोनवणे, पत्रकार सुनिल क्षिरसागर, मच्छिंद्र साळुंके, रोहन सरोदे व इतर मान्यवरांना शाल, गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच या विद्यार्थ्यांना नीता पवार, रोशनी पवार, चेतना पवार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा, पुणे येथे घेण्यात आलेल्या परीक्षेत आयुष कांतीलाल नागरे या विद्यार्थ्याला चॅम्पियन ऑफ चॅम्पियन हा पुरस्कार मिळाला. तसेच नाशिक जिल्हा येथे झालेल्या परीक्षेत पहिला क्रमांकचे विनर सोहम वाघ, अभय कड, स्मित साळी यांनी मिळवला. दुसरा क्रमांकाचे विनर काव्या फड, हेतांश सांगळे, रेवती गायकवाड, श्रमण ठाकूर यांनी मिळवला. तिसऱ्या क्रमांकाचे विनर विराज नागरे, श्रावणी खांदोडे, समृद्धी थोरात.

तर याच बरोबर बाकी विद्यार्थी वेदांत सानप, सिद्धी नागरे, ईश्वरी गायकवाड, ज्ञानवी खांदोडे, तनिष्ठा झडप,शावणी नागरे, आराध्या नागरे, तनुष्का खांदोडे, सात्विक जोशी, आरोही सोनवणे, अर्चित काळे, श्रावणी वाकचौरे, साहिल कडाळे, आयुष गगड या विद्यार्थ्यांचे राज्य पातळीवर निवड झालेली आहे. अशाप्रकारे वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांनी सन्मानित केले. कार्यक्रमाचे आयोजन सचिन कामडी व मोनाली कामडी यांनी केले तर सूत्रसंचालन सुनिल ठाकूर व कस्तुरी नागरे यांनी केले.

## मध्यवर्ती बसस्थानक नांदेड येथे कलापथकाद्वारे स्वच्छता जनजागृती

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, नांदेड :** नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने एसटी डेपो नांदेड आगाराच्या मध्यवर्ती बसस्थानक येथे दि.३ डिसेंबर २०२४ मंगळवार रोजी नाट्यनाद कलामंच नांदेड या कलापथकाकडून पथनाट्याद्वारे स्वच्छता अभियानाचे महत्त्व पटवून दिले.

पथनाट्यात त्यांनी सुका कचरा, ओला कचरा, घातक कचरा, प्लास्टीकचा वापर टाळा, शहर व घरे स्वच्छ ठेवा, स्वच्छता नियमाचे ज्ञान, निरोगी जीवनाचे वरदान अशा एक ना अनेक विषयांवर स्वच्छतेबद्दल जनजागृती केली व



स्वच्छतेबद्दलचे पत्रक प्रवाशी बांधवांना वाटप केले. नाट्यनाद कलामंच नांदेड यातील कलावंत अरविंद खंदारे, अकुश केंद्रे, प्रकाश शिंदे, इरबा गाडेगावकर, प्रियंका मोतीपवळे, मीरा केंद्रे हे पथनाट्यातील कलावंत होते. यावेळी एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावून आपले मनोगत व्यक्त केले.

ते आपले विचार मांडताना म्हणाले की, शहरात कचर्याची समस्या निर्माण होते ते नागरिकांकडूनच आपण जसे आपले घर स्वच्छ ठेवतो तसे जनतेने कचरा हा कचरापेटीतच टाकला पाहिजे, तरच स्वच्छ शहर, सुंदर शहर होऊ शकते असे प्रतिपादन करुन कलापथकाने स्वच्छतेबद्दल सुंदर असे पथनाट्य सादर केल्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन आभार व्यक्त केले.

### दिमाखदार

घवघवीत बहु मत
विजयश्री भरदार
शपथविधी सफळ
सोहळे दिमाखदार

होतो होऊद्या खर्च
राजा झाला उदार
पहावे तिजोरी कडे
नकोच्यावया उधार

खाते वाटप सत्वर
भल्या खांद्या मदार
मालक नाही तुम्ही
आहात किरायादार

लाडक्या बहिणीला
द्या अधिक आधार
शेती क्षेत्र महत्वपूर्ण
सोसे कर्ज मुक्तीभार

योजना परिपूर्णतेला
नको सामान्याप्रभार
अडचणीतले उद्योग
द्यावा सक्षमते उभार

पसंती दिली जनतेने
नसोत कोरडेआभार
गा-हाणीसोडवायला
भरवा जनता दरबार

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## RCCPL कंपनीत ४२ वा 'मेटॅलिक माईन सुरक्षा सप्ताह' कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.०४, झरी (यवतमाळ) :** ४२व्या मेटॅलिक माइन सेफ्टी महिन्याच्या शेवटचा दिवस समारोप समारंभ आणि बक्षीस वितरण सोहळा-२०२४ (खाण सुरक्षा महासंचालनालयाच्या अधिपत्याखाली) ३० नोव्हेंबर रोजी मुकुटबनच्या RCCPL Pvt Ltd कंपनी लाइम स्टोन आणि डोलोमाईट माइन्स येथे संपन्न झाला.

रामावतार मीना, उपमहासंचालक, माइन सेफ्टी वेस्टर्न रिजन, नागपूर, श्रम आणि रोजगार मंत्रालय, भारत सरकार, हे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमात उपस्थित होते. तर आरसीसी पीएल प्रायव्हेट लिमिटेडचे मॅन्युफॅक्चरिंग आणि प्रोजेक्ट हेड रजत कुमार पुस्ती या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. भारत सरकारच्या खाण सुरक्षा महासंचालकांच्या विशेष ऑपरेशनचा एक भाग म्हणून खाणींमध्ये सुरक्षा आणि कल्याणकारी उपायोजनांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक मेगा इव्हेंट आयोजित केला जातो. RCCPL Pvt Ltd च्या मुकुटबन लाइम स्टोन आणि डोलोमाईट माइन्स या मेगा इव्हेंटचे विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमादरम्यान विविध संस्थांकडून मुकुटबन लाइमस्टोनला सर्वोत्कृष्ट पुरस्कार मिळाला. ५०० हून अधिक मालक, अधिकारी, कुटुंबे व कामगार उपस्थित होते.



कार्यक्रमाचे आयोजन मुकूटबन स्कूल आणि माईन्स टीमने सुरक्षेविषयी सुंदर संदेश देणारे स्किट, विविध सुरक्षा आणि सीएसआर स्टॉल्ससह केले होते. ज्यात सुरक्षा आणि कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचे संदेश समाविष्ट होते. यंदा नागपूर विभागातील खाण सुरक्षा संचालक कार्यक्रमात उपस्थित होते. ११ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर या कालावधीत साजरा करण्यात आलेल्या सुरक्षा सप्ताहाच्या कार्यक्रमात कार्यक्षेत्रातील एकूण ३३ खाणींनी सहभाग घेतला. मेसर्स आरसी सीपीएल प्रायव्हेट लिमिटेडच्या मुकूटबन लाइमस्टोन माइनला लार्ज मेकॅनाइज्ड ओपन कास्ट माइन श्रेणीमध्ये एकूण सर्वोत्कृष्ट खाण म्हणून घोषित करण्यात आले आणि विविध श्रेणींमध्ये इतर पुरस्कारही देण्यात आले.

या पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन समन्वयक नीरज कुमार, माइन सेफ्टी नागपूर विभाग १ चे संचालक के. रविंदर, खाण सुरक्षा संचालक, नागपूर पश्चिम क्षेत्र १, श्रम आणि रोजगार मंत्रालय, भारत सरकारचे इतर संचालक आणि उपसंचालक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे शंकर करडे यांच्या लेखणीचा गोवा राज्यात सन्मान

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०४, ठाणे :** मुरबाड तालुक्यात गेली २० वर्षांपासून पत्रकारिते मध्ये काम करत, समता सामाजिक फाऊंडेशन आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवत संघाचे प्रदेश अध्यक्ष, वसंतराव मुंडे, राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर सामाजिक काम करणारे,



शांत संयमी, अभ्यासु पत्रकार शंकर करडे त्यांच्या कामाची दखल घेत, गोवा बुक ऑफ रेकॉर्ड इंडिया च्या विद्यमाने २०२४ चा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार गोवा राज्याची राजधानी पणजी येथील संस्कृती भवन येथे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रमाकांत खलप यांच्या शुभहस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

३ बुलडाणा, गुरुवार, दि.०५ डिसेंबर २०२४ संमिश्र

# थोडक्यात

## ह्युमन राईट जस्टीस असोसिएशन तर्फे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**अक्षराज : प्रमोद चिनके**

**दि.०४, सांगली :** मानव अधिकार दिवसा निमित्त शासनाने सार्वजनिक उपक्रम राबवावे अशी मागणी ह्युमन राईट जस्टीस असोसिएशन तर्फे करण्यात आली.

ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशन ही मानवाधिकार, समता व न्याय यासाठी कार्यरत असणारी देशपातळीवर संस्था असून या संस्थेतर्फे दिनांक ३ डिसेंबर रोजी माननीय जिल्हाधिकारी यांना एक निवेदन देण्यात आली या निवेदनामध्ये संस्थेने मागणी केली आहे की १० डिसेंबर हा दिवस जगभर मानवाधिकार दिवस म्हणून साजरा केला जातो व या दिवशी सर्व जगाला मानवाच्या हक्क अधिकारा संदर्भात जाणीव जागृतीसाठी कार्यक्रम केले जातात मानवाधिकाराचे महत्त्व समजावून सांगितले जातात. परंतु भारतामध्ये या संदर्भात उदासीनता दिसून येते म्हणून ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशनच्या महाराष्ट्र शाखेतर्फे माननीय जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे की या दिवशी शासनातर्फे मानवाधिकाराच्या हक्क व अधिकार यांची जाणीव करणारे उपक्रम शासनातर्फे सार्वजनिक ठिकाणी राबवण्यात यावे. जेणेकरून सर्वसामान्य माणसांना त्यांच्या हक्क अधिकार याची जाणीव होईल व मानवाधिकाराचे महत्त्व वाढीस लागेल. ह्यूमन राइट जस्टीस असोसिएशन हा दिवस दरवर्षी वेगवेगळ्या उपक्रमाद्वारे साजरा करत असतो.

यावेळी निवेदन देताना ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशनचे राज्याध्यक्ष नासिर भाई सय्यद व राष्ट्रीय सरचिटणीस हनीफ डफेदार, जिल्हा सचिव युसुफ शेख, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रमोद चिनके, राज्य कार्यकारणी सदस्य इरफान पखाली, जिल्हा सदस्य समीर नदाफ, जिल्हा सदस्य इरफान पट्टेवाले, मतिऊल्लाह शेख, आदी उपस्थित होते.

## पत्रकार आरोग्य तपासणी दिन माथेरानमध्ये संपन्न



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०४, माथेरान :** मराठा पत्रकार परिषदेचा वर्धापन दिन हा दिवस पत्रकार आरोग्य तपासणी दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने मात्र मध्ये आज पत्रकारांचे आरोग्य शिबिर माथेरान बी जे हॉस्पिटल येथे संपन्न झाले.

तीनही ऋतूंमध्ये कशाची तमा न बाळगता वार्ता संकलन करण्यासाठी पत्रकार लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमी तत्पर असतात वेळप्रसंगी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून जनतेच्या हितासाठी नेहमीच झटताना दिसतात. एक सामाजिक बांधिलकी म्हणून पत्रकार लोकाभिमुख प्रश्न शासन दरबारी मांडून त्यांचा निपटारा करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात त्यांचे आरोग्य सदृढ असावे यासाठीच येथील माथेरान प्रेस क्लबच्या सर्व सदस्यांचे आरोग्य तपासणी शिबिर आज येथील बीजे रुग्णालयात रायगड प्रेस क्लबचे सहसंघटक मिलिंद कदम यांच्या पुढाकाराने जेष्ठ पत्रकार मुकुंद रांजणे यांच्या प्रमुख उपस्थितीत माथेरानचे मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक राहुल इंगळे,माथेरानच्या आरोग्य अधिकारी डॉ.रुपाली मिसाळ,डॉ.रॉय सर्व हॉस्पिटल कर्मचारी तसेच माथेरान नगरपालिका कार्यालय अधीक्षक सदानंद इंगळे, प्रवीण सुर्वे ज्ञानेश्वर सदगीर, लेखापाल अंकुश इचके, स्वच्छता विभाग नरेंद्र सावंत अभियंत्या करुणा बांगर यांच्या सहकार्याने यशस्वी पार पडले. यावेळी पत्रकार मिलिंद कदम,मुकुंद रांजणे,गिरीश पवार, चंद्रकांत सुतार, संजय भोसले, संतोष खाडे यांसह अन्य उपस्थित होते.

## ५ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांसाठी ०८ डिसेंबर रोजी उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम

**दि.०४, ठाणे :** ठाणे जिल्हा परिषद क्षेत्रात, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत रविवार ०८ डिसेंबर, २०२४ रोजी ग्रामीण भागातील अंबरनाथ, कल्याण, भिवंडी, मुरबाड तालुक्यात तसेच बदलापूर व अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रात उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येणार आहे. सर्व बालकांना विहित वयात प्राथमिक लसीकरण, नियमित एएफपी सर्व्हेक्षण आणि पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेतंर्गत ० ते ५ वर्षाखालील सर्व बालके संरक्षित करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. राज्यात सन १९९५ पासून दरवर्षी पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येते.

ठाणे जिल्हा परिषदच्या सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत कार्यरत सर्व आरोग्य केंद्रामध्ये ही लस मोफत उपलब्ध करण्यात आली आहे. त्याचा लाभ पालकांनी ० ते ५ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना द्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे. ग्रामीण भागातील ० ते ५ वर्षाखालील १ लाख ८ हजार ७२४ बालकांना तर बदलापूर व अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रातील ६८ हजार ८३३ बालकांना असे एकूण १ लाख ७७ हजार ५५७ बालकांना पल्स पोलिओ लस देण्याचे नियोजन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

ठाणे जिल्हा परिषद क्षेत्रात, एकूण १ हजार ४०३ बूथवर ही लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी ठाणे जिल्हा परिषद ३ हजार ४४० कर्मचारी कार्यरत असतील. गेल्यावेळी झालेल्या मोहिमेत ठाणे जिल्हा परिषद क्षेत्रात, ० ते ०५ या वयोगटातील ०१ लाख ४० हजार ०९२ बालकांना लस देण्यात आली होती.

## विठ्ठलवाडी येथील जवान सदाशिव म्हसकर शहीद

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.४, विंचूर (नाशिक) :** विंचूर पासून जवळच असलेले विठ्ठलवाडी येथील जवान विंचूर (विठ्ठलवाडी) येथील भूमिपुत्र शहिद सदाशिव अशोक म्हसकर हे लेह (जम्मू काश्मीर) येथे कार्यरत असतांना आज अल्पशा आजाराने त्यांचे दुःखद निधन झाले. ते एक शेतकरी कुटुंबातील सदस्य होते आणि विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात त्यांनी आपले शिक्षण घेतले होते. त्यांच्या जाण्याने संपूर्ण विंचूर पंचक्रोशीत व विठ्ठलवाडी पंचक्रोशीत शोककळा पसरली असून, त्यांचा अंतिम विधी त्यांच्या गावात विठ्ठलवाडी येथे सायंकाळी होणार आहे.यावेळी विंचूर-लासलगाव परिसरातील ग्रामस्थ, कार्यकर्ते, अधिकारी, पोलीस, पत्रकार आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या वतीने रस्त्यावरती विद्यार्थी, शिक्षकांनी त्यांना नेत असलेल्या मार्गावर उभेराहून पुष्परुष्टी शहिद जवान सदाशिव म्हसकर यांना भावपूर्ण आदराने अर्पण केली.

# चैत्यभूमी येथील सोयी सुविधांचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, ठाणे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो अनुयायी चैत्यभूमी येथे येतात. त्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेऊन संबंधित सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले. दरम्यान, महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी मुंबईत स्थानिक सुटी जाहिर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी करावयाच्या सोयी सुविधांचा आढावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे घेतला. या बैठकीस माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दूरदृश्यप्रणाली द्वारे उपस्थित होते. मुख्य सचिव सुजाता सौनिक, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के.गोविंदराज, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंग, सामाजिक न्याय विभागाचे सचिव विजय वाघमारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांच्यासह संबंधित विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले, बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांची संख्या दरवर्षी वाढत आहे. त्यांना भोजन, स्वच्छ आणि पुरेशी स्वच्छतागृहे, वैद्यकीय सुविधा, राहण्याची सुविधा, वाहतूक व्यवस्था, मदत आणि समन्वय कक्ष, सुरक्षा व्यवस्था आदी सोयी सुविधा पुरविण्यात येतात. या सुविधा पुरविताना कोणत्याही अनुयायाची गैरसोय होणार नाही, याची सर्व संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. महापरिनिर्वाण दिनाशी संबंधित सर्व समित्यांचे याकामी नेहमीच सहकार्य राहिले आहे, त्यांच्या सूचनांची दखल घेऊन सर्व कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत. हेलिकॉप्टरच्या माध्यमातून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्याचे नियोजन करण्यात यावे. परिसरात पूर्ण स्वच्छता राखण्यात यावी. विविध रेल्वे स्थानकांवर मदत कक्ष उभारण्यात यावेत, अशा सुचनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिल्या.

माजी उपमुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले, की दरवर्षी आपण चांगली सुविधा देण्याचा प्रयत्न करतो. यावर्षीही सुद्धा कोणतीही कमतरता राहणार नाही, याची काळजी घ्यावी. सर्वांनी समन्वयाने प्रयत्न करावेत. भोजन, आरोग्य, पाणी, स्वच्छता तसेच सुरक्षा आदी सुविधा दर्जेदार द्यावेत. स्थानिक समित्यांचे नेहमीच सहकार्य राहते. त्यांच्या सूचनांही योग्य प्रकारे अमंलात आणण्यात. अनुयायी संवेदना व्यक्त करायला येतात. संवेदनशीलता ठेवून शासनाच्या माध्यमातून चांगल्या प्रकार नियोजन करावे, अशा सूचना देऊन फडणवीस यांनी यावेळी विविध सुविधांबाबतची माहिती घेतली आणि त्याबाबतच्या नियोजनाबाबत समाधानही व्यक्त केले.

# चौफुली फाटा येथे बस ना दुरुस्त.. प्रवाशांची त्रस्त...

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.०४, नांदगाव (नाशिक) :** सुरक्षित प्रवासाची हमी देणारी एसटीच आता प्रवाशांसाठी धोकादायक ठरत आहे. खराब रस्त्यांमुळे आधीच खिळखिळ्या झालेल्या एसटीकडे महामंडळाच्या दुर्लक्षाची भर पडली आहे. प्रवाशांची सुरक्षितताच धोक्यात आली आहे. गाव तेथे रस्ता आणि रस्ता तेथे एसटी या घोषणेसोबत प्रवास करणारी एसटी राज्याच्या कानाकोपर्यात पोहोचली.

काही गावात रस्ता चांगला नसतानाही केवळ प्रवाशांची गैरसोय नको म्हणून सेवा दिली जात आहे. मात्र त्या बसगाड्यांची अत्यंत दुर्दशा आहे. बसच्या खिडक्यांच्या काचा तुटल्या आहेत. काही गाड्यांना इंडिकेटर नाहीत. नवीन टायर उपलब्ध होत नसल्याने पंक्चरचे प्रमाण वाढले आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बाब गंभीर असतानाही महामंडळाने मात्र दुर्लक्षच केले आहे.



तालुक्यातील रस्ते खराब असल्याने त्यावर एसटीच्या आयुष्यमान संपत चाललेल्या गाड्या वापरल्या जात आहेत. गाड्यांचे इंडिकेटर खराब, बर्याच गाड्या तर चावीविनाच सुरू होतात. रस्ता खराब असल्याने बसगाड्यांची अधिकच दुर्दशा झाली आहे. खराब गाड्यांतून प्रवास करणे प्रवाशांसाठी धोकादायक ठरत आहे. महामंडळाचे आकर्षण असलेली मिनी बसही आता अखेरच्या घटका मोजत आहे. छोट्या बस सातत्याने नादुरुस्त होत रस्त्यात मध्येच बंद पडतात, अशा तक्रारी आहेत.

गाड्या स्क्रॅपमध्ये काढण्यात चालढकल नव्या बसगाड्या नसल्यामुळे नाईलाजाने एसटी महामंडळाला जुन्या बसगाड्यांद्वारे सेवा द्यावी लागत आहे. जुन्या, आयुष्यमान संपत चाललेल्या गाड्या स्क्रॅपमध्ये काढल्या जातात.

महामंडळाकडून दरवर्षी स्क्रॅप धोरण निश्चित करून विभागांना कळवले जाते. या वर्षात मात्र असे धोरणच कळवलेले नाही. त्यामुळे कोणत्या गाड्या भंगारात काढायच्या याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे, नांदगावहुन मालेगाव कडे जाणारी बस क्रमांक MH १४ BT ३३४६ दि.४ डिसेंबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास चौफुली फाटा येथे नादुरुस्त झाल्याने महिला प्रवाशांसह अनेकांना बराच वेळ ताटकळत बसावे लागले. तदनंतर

वाहकाने रिपोर्ट करून दुसरी बस बोलावुन प्रवाशांना मालेगाव कडे रवाना केले. भंगार बस रस्त्यावर धावतात यावर निर्बंध लावले गेले पाहिजे असे प्रवाशांकडून यावेळी प्रतिक्रिया दिल्या जात होत्या.

# गोकुंदा ग्रामपंचायतमध्ये सार्वजनिक सुलभ शौचालयांचा अभाव !

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०३, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यातील सर्वात मोठी आणि किनवट शहराला लागून असलेली गोकुंदा ग्रामपंचायत एक महत्त्वाची शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखली जाते. अनेक विद्यार्थी बाहेरगावाहून येऊन येथे शिक्षण घेतात.

मात्र, या परिसरात सार्वजनिक सुलभ शौचालयांची सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. गोकुंदा येथील शिक्षण संस्था आणि शैक्षणिक क्षेत्राला भक्कम पाया देऊनही मूलभूत सुविधा न मिळाल्याने विद्यार्थी व नागरिकांमध्ये नाराजी दिसून येत आहे. या समस्येमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण होत आहेत.

विशेषतः मुलींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. विद्यार्थ्यांचे व पालकांचे मत गोकुंदा येथे शिक्षणासाठी उत्तम वातावरण आहे, पण सार्वजनिक शौचालय नसल्याने मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागते. बाहेरून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती अधिक त्रासदायक ठरते, असे एका विद्यार्थ्याने सांगितले.

### प्रशासनाकडून दुर्लक्ष !

ग्रामपंचायत हद्दीत इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी असताना सार्वजनिक शौचालय नसणे, हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचे द्योतक आहे. ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन या समस्येचे निराकरण करणे गरजेचे आहे.

### विकासासाठी आवाहन !

स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी या समस्येवर आवाज उठवायला सुरुवात केली आहे. सार्वजनिक सुलभ शौचालयांसाठी निधी मंजूर करून काम लवकर सुरू करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.सरकार व स्थानिक प्रशासनाने यावर लक्ष देऊन विद्यार्थ्यांना व नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी पाऊले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस कार्यक्रमाचे १० डिसेंबर रोजी आयोजन




**दि.०४, मुंबई :** आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस दरवर्षी १० डिसेंबर रोजी साजरा करण्यात येतो. या वर्षाची संकल्पना (अवर राईट्स अवर फ्युचर राईट नाऊ) अशी आहे. यानिमित्त आयोजित राजभवन येथील दरबार हॉलमध्ये राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती निवृत्त न्यायाधीश एन.एच पाटील यांची असणार आहे.

या कार्यक्रमात पद्मश्री शंकरबाबा पापळकर (रा. अचलपूर, जि. अमरावती) हे अनाथ विकलांग मुलांच्या जीवनाच्या पुनर्वसन या विषयावर, टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सच्या सहायक प्राध्यापक डॉ. वैशाली कोल्हे दिव्यांग व्यक्तींचे हक्क, एनजीओचे श्रीरंग बिजूर ऑटीझम / एएसडी दिव्यांगाचे हक्क या विषयावर, हेल्पेज इंडिया संस्थेचे सहसंचालक व्हॅलेरिअन पैस ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच अंकुर ट्रस्टच्या सचिव डॉ. वैशाली पाटील आदिवासी कातकरी जमातीतील ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न या विषयावर, वाशिम येथील फार्मलॅब येरंडा ॲग्रोसोल्युशन प्रोड्युसर कंपनीचे संचालक संतोष चव्हाण शेतीतील खर्च कमी कसा करावा या विषयावर, बीआयएफ कंपनीचे अधिकारी संजय पाटील हे शेतीतील जैव विविधता व समाजातील हक्क या विषयावर संबोधीत करतील.

कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या २०२४ सोव्हिनिरचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कार्यक्रमात संपूर्ण राज्यातील ३५० विविध क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारे व्यक्ती सहभागी होणार आहे. तसेच कार्यक्रम ठिकाणी बांधावरील प्रयोगशाळा, आहार हेच औषध, महिला व मुलांची देह विक्रीबाबत जनजागृती, दिव्यांग व ज्येष्ठ नागरीक यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या माहितीवर व आदिवासी भागातील समस्या व त्यांचे हक्काबाबत जनजागृती करणारे स्टॉलही असणार आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्य मानवी हक्क आयोगाने महात्मा गांधी यांच्या ११ शपथांवर आधारीत समाजरचनेच्या संकल्पनेची मांडणी व्याख्यानांद्वारे व स्टॉलवरील प्रदर्शनीद्वारे करण्याचा प्रयत्न केला आहे, असे आयोगाचे अध्यक्ष के.के. तातेड, सदस्य एम.ए सईद, संजय कुमार, सचिव नितीन पाटील यांनी कळविले आहे.

## आनंदनगर भागातील दुकानांना भीषण आग

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.४, नांदेड :** शहरातील आनंदनगर भागात आज (बुधवार) पहाटे काही दुकानांना आग लागली. आग लागलेल्या दुकानांजवळ असलेल्या वैष्णवी हॉस्टेल मधील ७० मुलींना अग्निशामक दलाच्या जवानांनी सुखरुप बाहेर काढले. या आगीत मोबाईल शॉपी, हॉटेल व आईल मिल मिल मधील साहित्य जळून खाक झाले आहे. आनंदनगर भागातील नैवेद्यम हॉस्टेलला आज पहाटे ५ च्या सुमारास आग लागली. ही आग जीवेसी मोबाईल शॉपी व महालक्ष्मी ऑईल शोरुमपर्यंत पोहचली. पाहता-पाहता अग्नी ने रौद्ररुप धारण केल. या घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमक दलाचे किरोजी दासरे यांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. नैवेद्य हॉटेलच्या वरच्या मजल्यावर हॉस्टेल असून त्यामध्ये मुली अडकून पडल्या होत्या. अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी हॉस्टेलमधील ७० मुलींची सुखरूप सुटका केली. तसेच हॉटेलमधील ८ गॅस सिलेंडरही बाहेर काढले. आगीच्या या घटनेत तिन्ही दुकानांतील लाखो रूपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे. आग कशामुळे लागली याचे कारण मात्र अद्याप समजु शकले नाही.

# ढगाळ वातावरणामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव; फेंगल चक्रीवादळाचा परिणाम

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहिल्यानगर :** बंगालच्या उपसागरात फेंगल चक्रीवादळ निर्माण झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कमाल तापमानात वाढ होऊन थंडीमध्ये घट झाली आहे. कडाक्याच्या थंडीचे प्रमाण ओसरले आहे. वातावरणात ही कमालीचा बदल झाला आहे.

दिवसभर ढगाळ वातावरण असल्याने मका, ज्वारी, गहू, हरभरा, कांदा या पिकांवर देखील परिणाम होण्याची शक्यता आहे. या पिकांना थंडी ही पोषक असते व अशा वातावरण बदलामुळे रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता देखील वर्तवण्यात येत आहे.



शेतकर्यांनी पिकांची काळजी घ्यावी, असे आवाहन हवामान तज्ञांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. नोव्हेंबर महिन्याची सुरूवात झाल्यानंतर काही दिवसातच थंडी वाढू लागली होती.

गेल्या ८ दिवसात अहिल्यानगर शहराच्या तापमानामध्ये तब्बल पाच ते सहा अंशांनी घट झाली होती व त्यामुळे थंडीचा कडाका जाणवायला लागला होता.

१९ नोव्हेंबरला अहिल्यानगर शहराचे किमान तापमान ११.६ अंश होते त्यामुळे सर्वात कमी तापमानाची नोंद अहिल्यानगरमध्ये झाली होती. हवामान विभागाच्या माध्यमातून थंडीची लाट येईल अशी देखील शक्यता वर्तवण्यात आलेली होती. मात्र, फेंगल चक्रीवादळाचा परिणाम हा हवेतील वातावरणावर झाला. त्यामुळे सोमवारी १२ तर किमान तापमान २८ अंश सेल्सिअस व मंगळवारी किमान तापमान २१ तर कमाल २८ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले व तापमानात ९ अंशाने वाढ झाल्याचे दिसून आले. चक्रीवादळाचा परिणाम होऊन थंडी देखील आता कमी झाली आहे व दोन दिवसात सहा अंशांनी तापमान घसरले आहे. यामुळे काहीसा उकाडा देखील वाढला आहे. दरम्यान, गेल्या तीन दिवसांपासून संपूर्ण दिवसभर ढगाळ वातावरण असल्याने सूर्यदर्शन देखील झाले नाही. पुढील तीन दिवस शहर व जिल्ह्यात सर्वत्र ढगाळ वातावरण राहील असा अंदाज वर्तविण्यात आलेला आहे. यामुळे कांदा, गहू, हरभरा व इतर पिकांवर देखील परिणाम होण्याची शक्यता आहे.

# विहिरीत पडलेल्या सायाळला प्राणी प्रेमीकडून जीवनदान

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०४, कळंब (धाराशिव) :** दोन दिवसापासून कळंब शहराजवळील शेतातील विहिरीत पडलेल्या सायाळ (साळींदर) या वन्यजीव प्राण्याला कळंब येथील पक्षप्रेमी नागरिक यांनी वनविभाग कर्मचाऱ्यांशी संपर्क केला. दिनांक ३ नोव्हेंबर रोजी सतत २ तास प्रयत्न करून वन विभाग कर्मचारी व व त्यांचे सहाय्यक यांन सायाळला विहिरीच्या वरती काढण्यात यश आले.

याबाबत माहिती अशी कळंब - हावरगाव. रस्त्यावरील व कळंब शहराच्या लगत ओढ्याकाठी संदिपान करंजकर यांची शेती आहे. करंजकर आपल्या शेतातील विहिरीवरील मोटार चालू करण्यासाठी २ डिसेंबर रोजी गेले



असता त्यांना विहिरीत पडलेला सायाळ पक्षी आढळून आला. विहीर ५० फ ूट खोल असून विहिरीत उतरण्यासाठी पायऱ्या नाहीत. यामुळे या पक्षाला वरती कसे काढायचे हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. त्यांनी या विषयाची माहिती कळंब येथील प्राणीप्रेमी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ व सामाजिक कार्यकर्ते माधवसिंग राजपूत यांना दिली. आडसूळ यांनी सायाळ ला वाचविण्यासाठी काय करता येईल.

याविषयी माहिती घेतली व भूम येथील वनविभाग कार्यालयाशी संपर्क केला व यानुसार दिनांक ३ डिसेंबर रोजी या कार्यालयाचे वन क्षेत्रपाल दत्तात्रेय फरताडे यांच्याशी संपर्क झाला. या कामासाठी वनमजूर कालिदास जाधव व त्यांचे सहाय्यक सुरेश चव्हाण व प्रकाश चव्हाण पोहोचले कमरेला दोर बांधून विहिरीत उतरून सतत २ तास प्रयत्न केल्या नंतर ३६ तास विहिरीत अडकून पडलेल्या या प्राण्याला विहिरीच्या बाहेर काढण्यात यश आले.

यानंतर येडशी येथील अभयारण्यात सोडण्यासाचा निर्णय घेण्यात आला. सायाळ हा वन्यजीव असून डोंगर, झाडी, ओढा, नदीकाठावरील शेती, ऊस शेती यामध्ये वास्तव्य करतो याला सायाळ, साळ, साळू या नावाने ओळखतात याची लांबी ३ फूट पर्यंत असते शेपूट ८ ते ९ सेंटीमीटर लांब असते.

शरीरावरील राठ, टनक पिच्छदंड सायाळ (साळींदर) याचे वैशिष्ट्ये आहे भीतीदायक परिस्थितीत संरक्षणासाठी त्याचे पीछेदंड ताठ होतात त्याच्या शत्रूशी लढताना तो त्याची शेपटी असलेले काटेरी पीच्छदंड याचा उपयोग करतो तो जमिनीत किंवा कपारीत बिळात राहतो. हा प्राणी निशाचर आहे वन्यजीव संरक्षण कायद्याने या प्राण्याच्या शिकारीस बंदी घातलेली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयतील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

## प्रशासकीय पत्रव्यवहार निर्दोष आणि सोपा असावा - जिल्हाधिकारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४. छत्रपती संभाजीनगर :** शासकीय पत्र व्यवहार, टिपणी लेखन निर्दोष आणि सहज समजेल अशा भाषेत असायला हवे. यासाठी भाषा, व्याकरण, शुद्धलेखन यावर विशेष लक्ष देऊन अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय काम काज करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी बुधवार, दिनांक ०४ डिसेंबर रोजी प्रशिक्षण कार्यक्रमात दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी प्रशासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपणी लेखन, नस्ती, अहवाल लेखन याबाबत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शक महसूल प्रबोधिनीतील प्रशिक्षक अरुण जोशी उपस्थित होते. अपर जिल्हाधिकारी डॉ.अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन संगीता राठोड यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की शासनाचा पत्र व्यवहार ,विविध प्रस्ताव तयार करण्याचे काम हा लिपिकवर्गीय कर्मचारी करत असतो. या कामकाजात मराठी भाषेचा वापर करतांना व्याकरण, शुद्धलेखन, व सर्वसामान्यांना समजेल अशा सोप्या शब्दांचा वापर करावा. भाषेविषयीचे नियम, शासकीय नस्ती इ. अवलोकन करून आपले ज्ञान अद्ययावत करावे. विविध शब्दांचे अर्थ व त्याप्रमाणे




शब्दांचा योग्य उपयोग करून प्रशासकीय काम लोकाभिमुख आणि सोपे करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शासकीय पत्र व्यवहार, टिप्पणी लेखन यामध्ये असणाऱ्या विविध विषयाच्या मुद्देनिहाय माहिती अंतर्भूत करणे. चूका होऊ नये त्यासाठी आवश्यक ती घ्यावयाची काळजी घेणे. परिपूर्ण पत्रव्यवहारासाठी संबंधित शासन निर्णयांचे संदर्भ देणे इ. बाबी आवश्यक असल्याचे प्रशिक्षक अरुण जोशी यांनी सांगितले. या प्रशिक्षणात जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी सहभागी झाले.

# मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कमलिनी कर्णबधिर विद्यालय येथे दिली भेट

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०४, ठाणे :** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शैक्षणिक गुणवत्ता व विद्यार्थ्यांना मि ळणाऱ्या सोईसुविधाची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी बुधवार, दि. ०४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी साडे दहा वाजता कम लिनी कर्णबधिर विद्यालय, ठाणे (पू) येथे भेट दिली. यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे, कमलिनी कर्णबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक माया कुलकर्णी, शिक्षक तसेच मोठ्या संख्येने शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

या भेटी दरम्यान शाळेतील वातावरण कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी सकारात्मक असून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी कमलिनी कर्णबधिर विद्यालयातील शिक्षकांनी म ोलाची कामगिरी केली आहे असे कौतुक मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले. शाळा भेटीतून शालेय कामकाज, वर्गातील अध्यापन, विद्यार्थी अध्ययन स्तर, शाळेतील वर्ग व्यवस्थापन, सीएसआर सहकार्यातून मिळालेली शैक्षणिक साहित्य, शिक्षकांच्या अध्यापनामध्ये शैक्षणिक साहित्याद्वारे कर्णबधिर मुलांच्या अध्ययन क्षमतेत होणारी वाढ याविषयांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. शाळेतील 'वाचा व श्रवण कक्ष' पाहणी यावेळी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक वाचन तसेच प्रगती साधण्यासाठी आवश्यक बाबीबद्दल मार्गदर्शन करण्यात आले, तसेच भावी काळात कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या अध्ययनात वाढ करण्यासाठी योग्य त्या सुविधा उपलब्ध करून दिले जाईल व विद्यार्थी आणि शाळेच्या गरजा पुरवण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल असेही आश्वासन जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे यांनी दिले.

# राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम; बालकांची होणार आरोग्य तपासणी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, छत्रपती संभाजीनगर :** अंगणवाडी व शाळास्तरावर ० ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत असून तपासणीअंती गंभीर आजार आढळल्यास तात्काळ संदर्भित करण्याचे निर्देश असून याबाबत बुधवार, दिनांक ०४ डिसेंबर २०२४ रोजी आरोग्य यंत्रणेचा आढावा घेण्यात आला.

देवगिरी महाविद्यालयातील गुरुदेव रविंद्रनाथ टागोर सभागृहात आज हा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बढे व सर्व तालुका आरोग्य अधिकारी तसेच शिक्षणविभागांतर्गत सर्व केंद्र प्रमुख व शिक्षक वर्ग तसेच जिल्हा रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगणवाडीतील ० ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांची व शालेय विद्यार्थ्यातील १८ वर्ष पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी करुन काही गंभीर आजार असल्यास त्यांना संदर्भित करावे, असे निर्देश देण्यात आले.

# थोडक्यात

## धाराशिव येथे श्री दत्तगुरू जन्मोत्सव सप्ताह सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०४, धाराशिव :** गुरूचरित्र पारायण, भजन, कीर्तन, पालखी सोहळ्यासह भरगच्च कार्यक्रम त्रिलोक्याचे स्वामी भगवान श्री दत्तगुरूंच्या जन्मोत्सवानिमित्त धाराशिव येथे श्री दत्तगुरू जन्मोत्सव गुरूचरित्र पारायण- भजन- कीर्तन श्री दत्तनाम सप्ताह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताह सोहळ्यानिमित्त ९ ते १५ डिसेंबर या कालावधीत विविध भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. पिताश्री श्रीमंतराव रणदिवे प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी देखील श्री दत्तगुरू निवास, शांतिनिकेतन कॉलनी, धाराशिव येथे सप्ताह सोहळा घेण्यात येत असून सप्ताह सोहळ्याचे हे १० वे वर्ष आहे. श्री तुळजाभवानी देविजींचे महंत प.पू. तुकोजी बुवा, हभप आप्पाबाबा महाराज रुईकर, हभप नवनाथ महाराज चिखलीकर यांच्या हस्ते सोमवार दि. ९ डिसेंबर रोजी श्री दत्तगुरूंच्या प्रतिमेचे पूजन करून या सप्ताह सोहळ्याचा शुभारंभ होणार आहे. सोमवारी (दि.९) सायंकाळी संगीत विशारद सम ाधान निचळ, श्रीकांत शिंदे, मंगळवारी (दि.१०) भजनसम्राट शिवकुमार मोहेकर तर बुधवारी (दि.११) सायं. ६.३० वा.तानसम्राट अजित कडकडे यांचा भजनसंध्याचा कार्यक्रम होणार आहे. गुरूवारी (दि.१३) सायं. ७ वा. गायनाचार्य योगेश इंगळे तर शुक्रवारी ( दि.१७) साय. ६.३० वा. गायक दिलीप सावंत यांची सेवा होणार आहे. सप्ताह सोहळ्यात दररोज दुपारी महिला भजनी मंडळाची भजनसेवा होणार आहे. सोमवारी (दि.९) मुक्ताई मंडळ गांधीनगर, मंगळवारी (दि.१०) सखी भजनी मंडळ यशवंत नगर, बुधवारी (दि.११) संत जनाबाई मंडळ शांतिनिकेतन कॉलनी, गुरूवारी (दि.१२) रुक्मिणी भजनी मंडळ बँक कॉलनी, शुक्रवारी (दि.१३) गजानन भजनी मंडळ गणेशनगर तर शहरातील जिजाऊनगर येथील जिजाऊ भजनी मंडळाची भजन सेवा शनिवारी (दि.१४) दुपारी होणार आहे. श्री दत्तगुरूंच्या जन्मोत्सवदिनी रविवारी (दि.१५) स. ८ वा. पालखी दिंडी सोहळा, स. १०.३० वा. हभप महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे काल्याचे कीर्तन, दु. १२ वा. श्रींचा जन्मोत्सव सोहळा व दु. १.३० वा. महाप्रसाद वाटप करून सप्ताह सोहळ्याची सांगता होणार आहे. सप्ताह सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा. असे आवाहन श्रीमंतराव रणदिवे प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय रणदिवे यांनी केले आहे.

## दिव्यांगांच्या न्याय हक्कासाठी आ.दाते परिवार कटिबद्ध - डॉ.प्रदिप दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** आमदार काशिनाथ दाते यांच्या मार्गदर्शनाखाली दाते परिवार कायम दिव्यांग बांधवांच्या आपल्या हक्कासाठी व न्यायासाठी कटिबद्ध राहणार असून आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांचे प्रश्न सोडवले जातील. अशी ग्वाही डॉ.प्रदिप दाते यांनी दिली. पारनेर येथे आमदार काशिनाथ दाते यांच्या निवासस्थानी जागतिक अपंग दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.प्रदिप दाते बोलत होते. यावेळी माळकूप येथिल अरुण गवळी, निर्मला भालेकर, पत्रकार शिवशंकर शिंदे, विष्णू शिंदे, भाळवणी येथील अरुण रोहोकले, दिपक रोहोकले उपस्थित होते. या वेळी आमदार काशिनाथ दाते परिवाराने जागतिक अपंग दिनानिमित्त सर्व दिव्यांग बांधवांच्या समस्या समजून घेतल्या. याप्रसंगी डॉ. प्रदिप दाते यांनी सर्व दिव्यांग बांधवांचा सन्मान केला.

## बनावट खत निर्मितीच्या कारखान्यावर कृषी विभागाचा छापा

### नेवासा येथील कारवाईत १६ लाखाचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०४, अहिल्यानगर :** नेवासा तालुक्यातील एका कृषी केंद्रावर कृषी विभागाने छापा टाकून त्याठिकाणी सुरू असलेल्या बनावट खताचा साठा जप्त केला. सुमारे १६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी नेवासा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेवासा तालुक्यातील जय किसान नावाचे हे दुकान कृषी विभागाने सील केले आहे. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांना मिळालेल्या माहितीनुसार नेवासा तालुक्यातील एका दुकानात बनावट खत निर्मिती होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे, कृषी अधिकारी प्रताप कोपनर, बाळासाहेब कासार, रखमाजी लांडे, राहुल ठोंबरे, प्रवीण देशमुख, कृषी सहाय्यक दिलीप घोंळवे यांच्या पथकाने छापा टाकून ही कारवाई केली. सदर छाप्यात खत निर्मितीसाठी लागणारी आवश्यक रसायने, खत, रिकाम्या खतांच्या बॅग, बॅग सिलिंग मशिन व इतर साहित्य जप्त करण्यात आले. सदर कृषी केंद्राकडे घाऊक खत विक्रीचा कुठलाही परवाना तसेच उत्पादनाचा परवाना नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे कृषी विभागाने सदर दुकान सील केले आहे.

## सिमेंट रस्त्याचे काम दर्जेदार करा; नागरिकांची नगरपरिषदेकडे मागणी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरात विधानसभा निवडणुकीच्या पुर्वी विविध विकास कामांचे भूमिपूजन माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. शहरातील सुभाष गंज मोंढा लिंबुनीनगर भागात ही गऊळी समाज मारोती मंदीर ते साई बाबा मंदिर गोडसे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. सदर सिमेंट रस्ता हे कमीतकमी एक फुट खोदकाम करुन दर्जेदार करण्यात यावा. या रस्त्यावर सिमेंट व घडी पावडरचे १६ चाक असलेले वाहणं तसेच गॅस एजन्सी चे सिलेंडर भरून हांडे वाहन आठवड्यातून ४ ते ५ वेळा या रस्त्यावरून वाहतूक होत असुन सदर रस्त्यामध्ये निकृष्ट किंवा थातूरमातूर न करता गजाळी रॉड दर्जेदार सिमेंट वापरून हा रस्ता मजबूत करण्यात यावा. अशी आमची या निवेदनाद्वारे येथील रहिवासी पुष्पाबाई सोनी, नागनाथ गोडसे, अरविंद पिंगळे, प्रतिक चिद्रावार, श्रीनिवास वट्टमवार, कमलेश चौदंते, ईश्वर पिन्नलवार, रामराव बोधनकर, श्रीकांत कालाणी, रोहीत आंबरखाणे, पिंटू ठाकूर यांनी मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले.